प्रेसनोट

दिनांक १९/०८/२०१९

**आरोपी लोकसेवक आनंद माणिकराव कुलकर्णी वय ४५ वर्षे, पद मुख्यालय सहायक, वर्ग–३ नेमणुक उप अधीक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, औसा, जि. लातूर मुळ रा.यशवंत सोसायटी, बिदर रोड उदगीर यांनी १०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विाकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांनी त्यांची शेतीची मोजणी करण्यासाठी अतितातडीची मोजणी फिस भरलेली होती. परंतु तक्रारदार यांना मोजणीची तारीख लवकर मिळवून देण्याचे कामासाठी भुमिअभिलेख कार्यालय, औसा येथील एक लोकसेवक १०००/– रुपये लाचेची मागणी करत असलेबाबतची अशा आशयाची तक्रार दिनांक १४.०७.२०१९ रोजी लाच लुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. कार्यालयात प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तकारीच्या अनूषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयाकडून दिनांक १४/०८/२०१९ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक आनंद माणिकराव कुलकर्णी यांनी तक्रारदार यांनी त्यांचे शेतीची मोजणी करण्यासाठी अतितातडीची मोजणी फिस भरलेली होती. परंतु तक्रारदार यांना मोजणीची तारीख लवकर मिळवुन देण्याचे कामासाठी १०००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले.

आज दिनांक १९/०८/२०१९ रोजी १४.०७ वाजता भुमिअभिलेख कार्यालय, औसा, जि.लातूर येथे आरोपी लोकसेवक आनंद माणिकराव कुलकर्णी यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेवुन तक्रारदार यांना भुमिअभिलेख कार्यालय, औसा, येथे देण्यास पाठविले असता आरोपी लोकसेवक आनंद माणिराव कुलकर्णी यांनी १,००० /– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्यांचे विरूध्द पोलीस औसा जि. लातूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (संशोधन) २०१८ अन्वये गुंन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. अरविंद चावरीया अपर पोलीस अधिक्षक श्रीमती अर्चना पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोह/संजय पस्तापुरे, पोना/चंद्रकांत डांगे, माहेन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, पोकॉ/शैलेश सुडे, सचिन धारेकर, दत्ता विभुते, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे मपोशि/रुपाली भोसले चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीसंदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्सास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

१) **मा.श्री.अरविंद चावरीया पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. मोबाईल कमांक ९९२३१०५५००**

| | | |
|---|---|---|
| २) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– | मोबाईल कमांक ९९२३६६६६४४ |
| ३) कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– | मोबाईल कमांक ९६५७७०९८४१ |
| ४) टोल फ्री हेल्पलाईन कमांक | :– | १०६४ |
| ५) कार्यालयाचा फोन कमांक | :– | ०२४८२–२४२६७४७ |
| ६) Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ८) Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर